॥ श्री गणेशाय नमः ॥
कुणाल वधवा
9765595037
9405171771
# श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९४ ■ सोमवार २७ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26



उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# राहुल गांधींचे गृहमंत्री अमित शाह यांना पत्र
# लाठीमार, पॅलेटगन वापर कुणाच्या आदेशाने



**नवी दिल्ली, दि. २६ : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी वीस जुलै रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलन दरम्यान पोलिसांनी केलेल्या कारवाईबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहून स्पष्टीकरण मागितले आहे. विद्यार्थ्यांवर लाठीमार आणि पॅलेट गनसारख्या साधनांचा वापर करण्याचे आदेश कोणी दिले, असे दोन महत्त्वाचे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.**

**राहुल गांधी यांनी पत्रात म्हटले आहे की, संसद चलो मोर्चा दरम्यान विद्यार्थी शांततापूर्ण पद्धतीने शिक्षण व्यवस्थेशी संबंधित मागण्यांसाठी आंदोलन करत होते. मात्र, त्यांच्या मागण्या ऐकून घेण्याऐवजी पोलिसांनी लाठीमार केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केल्याचा आरोप त्यांनी केला.**

दिल्लीतील आंदोलनाबाबत राहुल गांधी यांच्या मते, या कारवाईत शेकडो विद्यार्थी जखमी झाले. महिला विद्यार्थिनींनाही मारहाण झाल्याचे आरोप आहेत. तसेच, पॅलेट गनच्या वापरामुळे काही जण गंभीर जखमी झाल्याचा दावा त्यांनी पत्रात केला आहे. एकोणावीस वर्षीय विद्यार्थी साहिल लोचब याची भेट घेतल्याचा उल्लेख करत, त्याच्या एका डोळ्याची दृष्टी जाण्याची शक्यता असल्याचेही राहुल गांधी यांनी नमूद केली आहे.

**शाहांना विचारले दोन प्रश्न**

विद्यार्थ्यांवर पॅलेट गनसारख्या साधनांचा वापर करण्यास गृहमंत्री म्हणून मंजुरी देण्यात आली होती का? जर नाही, तर त्यास परवानगी कोणी दिली? साध्या वेशात विद्यार्थ्यांवर लाठ्यांनी हल्ला करताना दिसणारे लोक पोलीस कर्मचारी होते की इतर व्यक्ती? त्यांच्या तैनातीला अधिकृत मंजुरी कोणी दिली? राहुल गांधी यांनी या संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित आरोपांवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह किंवा केंद्र सरकार कडून प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

## पेपरफुटीच्या विरोधात नवे विधेयक मांडणार

नवी दिल्ली, दि. २६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आश्वासनानंतर, केंद्रीय कार्मिक आणि प्रशिक्षण मंत्री जितेंद्र सिंह उद्या (दि. २७) लोकसभेत नवीन विधेयक सादर करण्याची शक्यता आहे. शिक्षा आणि दंडाच्या तरतुदी आणखी सक्त करण्यात आल्या आहेत. विधेयकात कलम १२ अ आणि १२ ब अशी दोन नवीन कलमे जोडण्यात आली आहेत.

याअंतर्गत, केंद्र सरकारला एक विशेष कृती दल स्थापन करता येईल. केंद्रीय तपास यंत्रणा किंवा एसआयटीला प्रकरण केंद्र सरकारकडे सोपवल्यानंतर दोन महिन्यांच्या आत तपास पूर्ण करणे बंधनकारक असेल. जलदगती न्यायालयांमार्फत दररोज सुनावणी घेतली जाईल. राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सल्ल्याने विशेष जलदगती न्यायालये (पान ४ वर)

# जंतर मंतरवरील लाठी हल्याचा निषेध करत धुळे शहरात सर्व समावेशक भव्य विजय रॅली




**धुळे, दि.२६ - दिल्लीतील जंतरमंतर आणि संसद भवन परिसरात विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ तसेच देशातील परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींविरोधात रविवारी दि. २६ जुलै २०२६ रोजी धुळे शहरात इंडिया आघाडीच्या सर्व घटक पक्षांसह विविध समविचारी सामाजिक व विद्यार्थी संघटनांच्या वतीने भव्य 'विजय तिरंगा रॅली' काढण्यात आली.**

हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते, विद्यार्थी, युवक-युवती आणि नागरिक सहभागी झालेल्या या मोर्चाने शहरातील प्रमुख मार्ग दणाणून सोडले. मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून मनोहर चित्र मंदिर परिसरातून झाली. त्यानंतर तिरंगा ध्वज, फलक आणि घोषणांच्या गजरात हा मोर्चा राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आला. संपूर्ण मार्गावर देशभक्तीपर घोषणांसह विद्यार्थी हक्क, लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणाच्या घोषणा देण्यात आल्या. मोर्चादरम्यान विद्यार्थ्यांनी हातात विविध संदेशांचे फलक घेत केंद्र सरकारच्या धोरणांवर टीका केली. देशातील परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याची हमी देणारी प्रभावी व्यवस्था उभारण्याची मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जाऊ नये, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला. मोर्चादरम्यान आंदोलकांनी देशातील विविध राज्यांमध्ये वारंवार होत असलेल्या परीक्षा पेपरफुटीच्या घटनांवरही तीव्र संताप व्यक्त केला. ज्या ज्या राज्यांमध्ये कोणत्याही शिक्षण विभागाच्या (पान ४ वर)

# पेपरफुटीची समस्या गंभीर राष्ट्रीय संकट झाले
# एकोणावीस राज्यात पेपरमाफियांचे जाळे सक्रिय

**नवी दिल्ली, दि. २६ - देशातील स्पर्धा परीक्षा, शासकीय भरती आणि प्रवेश परीक्षांमधील पेपरफुटीची समस्या आता गंभीर राष्ट्रीय संकट बनली आहे. जवळपास २०१४ ते जुलै २०२६ या कालावधीत देशभरात किमान ११६ पेपरफुटीची प्रकरणे समोर आली आहेत. त्याचा फटका सुमारे साडेसात कोटी विद्यार्थी आणि उमेदवारांना बसल्याचा दावा विविध माध्यमांच्या अहवालांमध्ये करण्यात आला आहे. या काळात १९ राज्यांमध्ये पेपर माफियांचे संघटीत जाळे सक्रिय असल्याचेही समोर आले आहे.**

उपलब्ध माहितीनुसार, २०१४ ते २०२४ दरम्यान ८९ पेपरफुटीची प्रकरणे नोंदवण्यात आली. त्यामध्ये २१ केंद्रीय संस्था आणि ६८ राज्यस्तरीय परीक्षा प्रभावित झाल्या. त्यानंतर २०२५ मध्ये २०, तर जुलै २०२६ पर्यंत आणखी ७ प्रकरणे समोर आली. या प्रकारामुळे तीन लाख सरकारी नोकऱ्यांची भरती रखडली जानेवारी २०१९ ते जून २०२४ या कालावधीत १९ राज्यांतील ६५ परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्या. यामध्ये शासकीय भरती, प्रवेश परीक्षा, बोर्ड परीक्षा आणि विद्यापीठांच्या परीक्षांचा समावेश होता. या ६५ प्रकरणांपैकी ४५ प्रकरणे शासकीय भरती परीक्षांशी संबंधित होती. परिणामी किमान २७ परीक्षा रद्द किंवा पुढे ढकलाव्या लागल्या. ज्यामुळे तीन लाखांहून अधिक सरकारीपदांची भरती खोळंबली. शिक्षक आणि पोलीस भरती परीक्षा सर्वाधिक प्रभावित झाल्याचे दिसून आले. राज्यनिहाय आकडेवारीनुसार, उत्तर प्रदेशात सर्वाधिक ११, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी ९, महाराष्ट्रात ६, तर गुजरातमध्ये ५ पेपरफुटीची प्रकरणे नोंदवली गेली.

**केंद्रीय भरती परीक्षांनाही फटका**

एसएससी, केंद्रीय विद्यालय संघटन, यूपीएससी, आर्मी, ओएनजीसी आणि कृषी शास्त्रज्ञ भरती मंडळ यांसारख्या आठ केंद्रीय भरती परीक्षा रद्द कराव्या लागल्या. (पान ४ वर)




# नीट पेपरफुटी आंदोलनाला यश उबाठाने विद्यार्थ्यांसह वाटले पेढे

**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर मंतरवर गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले. यानिमित्ताने आज उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षातर्फे नंदुरबार शहरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र सरकारचा निषेध करत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाचे स्वागत करून पेढे वाटून आंनदोस्तव साजरा करण्यात आला.**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नेहरू चौकात आंदोलन करण्यात आले. शिवसैनिक आणि विद्यार्थी यांनी मोठ्या (पान ४ वर)

## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत झंडू कुमारला कास्य पदक

ग्लासगो, दि. २६ : ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने अखेर पदकांचे खाते उघडले आहे. बिहारच्या पॅरा पॉवरलिफ्टर झंडू कुमारने पुरुष हेविवेट गटात कांस्यपदक जिंकत भारताला स्पर्धेतील पहिले पदक मिळवून दिले. झंडू कुमारने स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या दुसऱ्या प्रयत्नात यशस्वी वजन उचलले. त्याच्या या सर्वोत्तम उचलच्या जोरावर त्याला ८४.२० गुण मिळाले आणि कांस्यपदकावर नाव कोरले. तिसऱ्या प्रयत्नात त्याने स्पर्धेचा विक्रम मोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात त्याला यश आले नाही. तरीही त्याची दुसरी सर्वोत्तम उचल पदकासाठी पुरेशी ठरली.

या स्पर्धेत नायजेरियाच्या रिलुवान इद्रिसने (पान ४ वर)

# साठ ला.च्या जमीन खरेदी फसवणूक प्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल

**शहादा, दि.२६ (प्रतिनिधी)- शहादा शहरातील सर्व्हे क्र. ६३, प्लॉट क्र. ३ च्या उत्तरेकडील कॉर्नर भागातील जमीन विक्रीच्या व्यवहारात ६० लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शहादा पोलीस ठाण्यात ५ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी मतिन रऊफ खाटीक (वय ३८), मूळ रा. धडगाव, ता. धडगाव, ह.मु. मलोणी प्लॉट नं. २९, आदर्श स्कूलजवळ, शहादा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. ०८/०८/२०२२ ते २५ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत आरोपींनी संगनमत करून संबंधित जमिनीची मालकी नसतानाही ती स्वतःच्या मालकीची असल्याचे भासविले. खोटी माहिती देत सौदा पावती करून फिर्यादीकडून ६० लाख स्वीकारले आणि फसवणूक केली.

या प्रकरणी इरफान इसहाक मनियार, इमराण हुसेन खान पठाण, शेख जावेद मन्सुरी, असरार सैफुद्दीन खेतीयावाले व आणखी एका आरोपीविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्व आरोपी शहादा येथील रहिवासी आहेत.

या गुन्ह्यात कोणताही मुद्देमाल हस्तगत झालेला नाही. प्रकरणाचा पुढील तपास पोउनि. विनोद पाटील हे करीत आहेत. तर शहादा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोनि. हेमतकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

# माजी सैनिक व एनसीसीच्या विद्यार्थ्यांसमवेत धुळ्यात कारगिल दिवस मोठ्या उत्साहात साजरा

**धुळे, दि २६ - आज २७ वा कारगिल विजय दिवस मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला माजी सैनिक, सैनिकांचे कुटुंबीय, एनसीसी कॅडेट्स, लष्करी अधिकारी आणि धुळ्यातील प्रमुख नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीमारेषेवर १९९९ च्या कारगिल युद्धात प्राणांची आहुती देणाऱ्या अमर शहीदांना सर्वप्रथम भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर एनसीसी कॅडेट्सनी कारगिल युद्धाच्या ऐतिहासिक विजयाबद्दल माहिती दिली.**



आयोजकांनी सांगताना स्पष्ट केले की, एरवी केवळ सैनिक आणि माजी सैनिक मिळून हा दिवस साजरा करत असत. मात्र, आता समाजातील प्रत्येक घटक, एनसीसी कॅडेट्स आणि कुटुंबीय एकत्र आल्याने सीमेवर तैनात असलेल्या आपल्या जवानांचे मनोबल निश्चितच उंचावेल. सोशल मीडिया आणि डिजिटल युगात (पान ४ वर)

## पुरात वाहिलेल्या बेपत्ता तरुणाचा मृतदेह सापडला

धुळे, दि.२६ - पांझरा नदी पात्रात वाहुन गेलेल्या मोटारसायकलस्वार तरुणाचा मृतदेह सापडला असून साक्री पोलिस ठाण्यात घटनेची नोंद झाली. प्रदिप दिलीप निकुंभ (वय ४, रा. दुसाणे ता साक्री) असे त्याचे नाव आहे. शुक्रवारी (२४ जुलै) सायंकाळी मोटार सायकलने जात होते. नांदवण शिवारात पांझरा नदीचे पुलावर पाण्याचा प्रवाहात वाहुन तो गेला. प्रदीपचा शोध सुरू झाला, शनिवारी (ता.२५) प्रदीप हाती लागला. लोकांचे मदतीने बाहेर काढुन ग्रामिण रुणालय साक्री येथे दाखल केले. डॉ. मुकेश मोरे यांनी मृत घोषित केले.

# दीपक अहिरे यांची रोटरी डिस्ट्रिक्टच्या सहाय्यक गर्व्हनर पदावर नियुक्ती



धुळे, दि.२६- रोटरी इंटरनॅशनलच्या सामाजिक सेवा, नेतृत्व विकास आणि मानवतेच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या जागतिक संस्थेच्या रोटरी डिस्ट्रिक्ट ३०६० अंतर्गत इंजि. दीपक डी. अहिरे यांची असिस्टंट गव्हर्नर पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे धुळे शहरासह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून विविध सामाजिक, व्यावसायिक आणि रोटरी क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर (पान ४ वर)




# जळगाव धुळे भीमस्मृती धम्म पदयात्रा भंते नागसेन यांच्या नेतृत्वाखाली सुरु

**धुळे,दि.२६ - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या धुळे जिल्ह्यातील लांडोर बंगला या ऐतिहासिक स्थळाला अभिवादन करण्यासाठी निघालेली मभीमस्मृती धम्म पदयात्राफ उत्साहात पुढे सरकत असून, पाऊस, वारा आणि प्रतिकूल हवामानाची पर्वा न करता भिक्खू संघ, उपासक-उपासिका आणि भीमसैनिक सामाजिक समता, बंधुता, धम्म आणि संविधान मूल्यांचा संदेश गावोगावी पोहोचवत आहेत.**

पूज्य भदंत ज्ञानज्योती महाथेरो (ताडोबा व्याघ्र अभयारण्य, चंद्रपूर) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि भंते नागसेन सातपुडा पर्वत (वराड, चोपडा) यांच्या नेतृत्वाखाली २१ जुलै रोजी जळगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून या ऐतिहासिक पदयात्रेला प्रारंभ झाला. सुमारे २०० किलोमीटरचा प्रवास करत ही पदयात्रा ३१ जुलै रोजी धुळे येथील लांडोर बंगला येथे पोहोचणार आहे. या पदयात्रेत भंते प्रियबोधी, भंते सूर्यज्योती, भंते नागज्योती, भंते धम्मज्योती, भंते आनंद, भंते आर्यनाग, भंते क्रांतिज्योती यांच्यासह अनेक भिक्खू सहभागी झाले असून, देशभरातील बुद्ध अनुयायी, उपासक-उपासिका आणि भीमसैनिकही मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभागी होत आहेत. २६ जुलै रोजी चांदणीकुऱ्हे, २७ जुलै रोजी अमळनेर येथे मुक्काम. त्यानंतर ३१ जुलै रोजी नवलनगर, पुढे भागाई स्कूल, गौतम नगर (धुळे) येथे मुक्काम करून पदयात्रा जुलै रोजी लांडोर बंगला येथे पोहोचणार आहे.


सहावे पुण्यस्मरण



कै.आप्पासो.प्रकाश जगन्नाथ देशमुख
(अमरधाम वखारवाले) स्व.दि.२७ जुलै २०२०
आप्पासाहेब तुमच्या पावन स्मृतीस विन्रम श्रध्दांजली व सुमनांजली
- शोकाकुल -
श्रीमती संध्या प्रकाश देशमुख
विजयेंद्र प्रकाश देशमुख | सौ.प्रियंका विजयेंद्र देशुमुख
ॲड.बिना प्रकाश देशमुख (नोटरी भारत सरकार) | चि.विश्वजीत विजयेंद्र देशमुख
सौ.शुभांगी विशाल सावंत | सौ.निता अजय इंगळे
सुजय किरण देशमुख | सौ.अपर्णा सुजय देशमुख
धिरज झंझणे
बिपीन, बुलबुल, मनवा, डेमी, कृष्णा, दादा, निशांत
समस्त देशमुख अप्पा परिवार, देवपूर अमरधाम, धुळे

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,31,450 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,500 रु.+3% GST
चांदी- 2,26,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

MACCIA ESTD 1927 Apex Chamber of the State
MAHARASHTRA CHAMBER OF COMMERCE, INDUSTRY & AGRICULTURE
CELEBRATING 100 YEARS

सस्नेह निमंत्रण

गाव तिथे उद्योजक A MACCIA Initiative

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स,इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर (MACCIA) यांच्या
'गाव तिथे उद्योजक' या संकल्पनेअंतर्गत आयोजित
'उत्तर महाराष्ट्राच्या प्रगतीचे नवे दशक - उद्योग मंथन'

• मुख्य अतिथी •



मा.श्री. अमरीशभाई पटेल
आमदार, माजी कॅबिनेट मंत्री (शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण)

आलेल्या सर्व मान्यवरांचे धुळे जिल्ह्यात हार्दिक स्वागत..!

• प्रमुख अतिथी •







मा.अनुपभैय्या अग्रवाल — आमदार, धुळे शहर
मा. सौ.मंजुळाताई गावित — आमदार, साक्री विधानसभा
मा. कुणालबाबा पाटील — माजी आमदार, धुळे ग्रामीण

• कार्यक्रमाचे अध्यक्ष •



मा.श्री. रविंद्र माणगावे
(अध्यक्ष) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्टी अॅण्ड ॲग्रीकल्चर (MACCIA)

• प्रमुख उपस्थिती •







श्री. आशिष पेडणेकर — चेअरमन, ट्रस्ट बोर्ड (MACCIA)
श्री. संतोषजी मंडलेचा — तत्कालीन माजी अध्यक्ष (MACCIA)
श्री. करुणाकर एस. शेट्टी — वरिष्ठ उपाध्यक्ष, (MACCIA)

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर (MACCIA) चे सर्व मा. उपाध्यक्ष

डॉ. धनश्री हरदास (मुंबई विभाग-१)
श्री. सिद्धार्थ रुहाटिया (विदर्भ विभाग)
श्री. किरण भोसले (मुंबई विभाग-II)
सौ. सुनीता फाल्गुने (उत्तर महाराष्ट्र विभाग-१)
श्री. संजय धनपाल शेटे (पश्चिम महाराष्ट्र विभाग-II)
श्री. सुनील किर्दक (मराठवाडा विभाग)
डॉ. संतोष शिवाजी राणे (कोकण विभाग)
श्री. सर्जेराव नलावडे (पश्चिम महाराष्ट्र विभाग-१)
श्री. सुरेश घोरपडे (सहकार्यवाह, MACCIA)
श्री. वेदांशू पाटील (निमंत्रित सदस्य, MACCIA)

मा. गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व विश्वस्त (MACCIA) तसेच सर्व ट्रस्टी, उद्योगपती, उद्योजक, व्यापारी व विविध क्षेत्रातील मान्यवर. आपली उपस्थिती उत्तर महाराष्ट्राच्या औद्योगिक, व्यापारी व आर्थिक विकासाच्या नव्या पर्वाची दिशा ठरविण्यास मोलाची ठरेल.

आयोजक



श्री. महेंद्र (कैलास) अग्रवाल
उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स (MACCIA)
(संचालक: ओमश्री ॲग्रोटेक प्रा. लि., धुळे)

• दिनांक : सोमवार, २७ जुलै २०२६ वेळ : सायं. ५ : ३० वा.
• स्थळ : हॉटेल गोल्डन लीफ, मुंबई हायवे, (मालेगाव रोड), धुळे.

संपर्क : श्री. राहुल बैसाणे- 8485086714 समन्वयक (MACCIA-उत्तर महाराष्ट्र-II)

- निमंत्रक -
गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, धुळे
श्री. ज्ञानेश्वर आबा भामरे (दोंडाईचा)
श्री. कैलाशचंद्र बी. अग्रवाल (शिरपूर)
श्री. किशोरचंद्र एस. पोद्दार (धुळे)

आपला महाराष्ट्र

# धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा : पुढे काय?

अखेर शनिवारी केंद्रीय मनुष्यबळ अर्थात शिक्षक मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला. जंतर-मंतरवर गेल्या २७ दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या तरुणांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या मागणीवर कोणतीही तडजोड होणार नाही जोपर्यंत प्रधान राजीनामा देत नाहीत तोपर्यंत विद्यार्थी आंदोलक जंतर-मंतर वरून हटणार नाहीत अशी अट टाकली होती. केंद्र सरकारने या संदर्भात विचार करण्यासाठी एक दिवसाची मुदत मागितली होती. तेव्हाच लक्षात आले होते की कुठल्याही क्षणी प्रधान यांचा राजीनामा होईल. समाजसेवक सोनम वांगचुक यांचे उपोषण संपल्यानंतर या प्रक्रियेला वेग येईल असे दिसतच होते त्याप्रमाणे घडले. जेन झींनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा मुख्य मुद्दा केला होता. तो केंद्रस्थानी ठेवल्याने त्यावरच सर्व चर्चा केंद्रित झाल्या होत्या. तो मुद्दा आता संपल्यामुळे जंतर मंतर रिकामे होईल. बाकीच्या मागण्यांचे काय होईल ते आजच सांगता येणार नाही. कॉक्रोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके यांनी नीट पेपर फुटीच्या प्रकरणातून ज्या तरुणांनी आत्महत्या केल्या त्या तरुणांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपये द्यावेत अशी मागणी केलेली आहे. शिवाय शैक्षणिक सुधारणांच्या संदर्भाची मागणी या आंदोलनात करण्यात आली होती. त्या मागण्यांचे नेमके काय होणार त्याचेही उत्तर आज देता येणार नाही. त्यासाठी आंदोलन जारी ठेवावे लागेल. पण तसे होणे आता शक्य दिसत नाही. कारण त्यातील मुख्य हवा निघून गेलेली आहे. जेपींच्या विद्यार्थी आंदोलनानंतर प्रथमच विद्यार्थ्यांनी उभे केलेले हे आंदोलन देशाने बघितले. ते कुठल्या एका व्यक्तीचे किंवा पक्षाचे नव्हते. ज्यांनी तसा इरादा ठेवला असेल तो इरादा तरुणांनी त्यांच्या हातून काढून घेतला होता. त्यामुळे हे आंदोलन पूर्णपणे तरुणांच्या हातात होते. त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाचा मुद्दा लावून धरला आणि त्यात ते विजयी झाले. अनेक वर्षानंतर दडपशाहीच्या विरोधात तरुण निधड्या छातीने जंतर-मंतरवर दिसले. ज्या दिवशी त्यांच्यावर लाठी मार झाला आणि अश्रूधूर सोडण्यात आला त्यादिवशी तरुणांनी अतिशय शांतपणे लाठ्या झेलल्या. पाण्याचे फवारे झेलले. तरुणांच्या खांद्याला खांदा लावून तरुणी देखील मोठ्या प्रमाणावर या आंदोलनात उतरल्या आणि त्यांनी आपला निर्धार दाखवून दिला. हा एक प्रकारे महात्मा गांधीजींच्या अहिंसक तत्वांचा आणि बाबासाहेबांच्या वज्र निर्धाराचा विजय म्हणावा लागेल. त्या दृष्टीने दीडशे वर्षा हून अधिक काळ लोटला तरी गांधी -आंबेडकर १४० कोटींच्या देशात मध्यवर्ती उभे आहेत. आणि तरुण-तरुणींना मार्गदर्शन करीत आहेत. त्याच पद्धतीचे उपोषण सोनम वांगचुक यांनी केले. उपोषण सोडताना त्यांनी एक चित्रफित प्रसारित केली. ज्यात देशाला दुषणे दिलेली आहेत. काही लोकांनी सोशल मीडियावर त्यांच्याविषयी शंका उपस्थित केल्या होत्या. ज्या पद्धतीने त्यांनी उपोषण सोडले आणि ज्यांच्या समोर सोडले त्याविषयीचे अनेक प्रश्न सोशल मीडियावर उपस्थित केलेले होते. त्यावर ते संतापले आणि नाराजीही व्यक्त केली. पण एक मुद्दा त्यांनी लक्षात ठेवायला हवा होता की, हा १४० कोटीहून अधिक लोकसंख्येचा देश आहे. वेगवेगळ्या मानसिकतेचे लोक येथे राहतात. त्यांच्या मनामध्ये शंका कुशंका असणारच शिवाय खूप लोकांच्या मनात वांगचुक यांच्या विषयी सहानुभूती आहे. त्यांच्या उपोषणाची तुलना त्यांनी गांधीजींच्या उपोषणाशी केलेली आहे. त्यांचे भरभरून कौतुक केलेले आहे. अशा पद्धतीने सकारात्मक विचार करणारे आणि आपणास पाठिंबा देणारे लोक सुद्धा आहेत. पण ते भडकले.

अंध भक्तांनी आंदोलकांना अर्थात तरुणांना देशद्रोही आणि दहशतवादी म्हटले होते. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे त्यांचे दात त्यांच्याच घशात गेले हेही नसे थोडके. राहुल गांधी, काँग्रेस, आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांच्या शिडातील हवा काढून टाकण्याचा एक योजनाबद्ध कार्यक्रम या आंदोलनात होता असे काही अभ्यासू पत्रकारांचे आणि विचारवंतांचे मत आहे. त्यास पुष्टी देणाऱ्या काही घटना घडल्या. म्हणून ती शंका नाकारता येत नाही. जेव्हा राहुल गांधी यांनी इंडिया आघाडीतील खासदारांना सोबत घेऊन आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या घरी त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे निमित्त साधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घरासमोर आंदोलन केले. त्यावरून वांगचुक यांच्या पतकीने राहुल गांधींच्या नेतृत्वाखालील आंदोलनास अप्रमाणिक म्हटले. जर ते आणि त्यांचा पक्ष तसेच आघाडीतील घटक पक्षांनी जंतर-मंतरला येऊन विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला समर्थन दिले असते तर ते प्रामाणिक दिसले असते असे जे त्यांनी म्हटले ती बाब प्रगल्भ राजकीय विचारसरणीत बसणारी नाही. आणखीही काही जणांनी अशा प्रकारची टिपणी केलेली आहे. लोकसभेतील जबाबदार विरोधी पक्षनेते आणि एका पक्षाचे शंभर खासदार सोबत असणारे राहुल गांधी असोत,की, आघाडीतील इतर घटक पक्ष असोत ते काही कुणालाही पाठिंबा देण्यासाठी पारावर बसलेले नाहीत. ही बाब टीकाकारांनी लक्षात घेणे गरजेचे होते. वास्तविक काँग्रेसने सुरुवातीपासूनच पेपर फूट प्रकरणी देशभर मोर्चे काढले मेळावे घेतले. नंतर ते सगळे बंद करून या आंदोलनात त्यांनी सहभागी व्हावे अशी अपेक्षा करणे गैर ठरते. असे असले तरी त्यांनी पवन खेरा आणि अन्य काँग्रेस जनांना जंतर-मंतरवर पाठविले. आंदोलनाचे समर्थन केले. जखमी विद्यार्थ्यांची भेट घेतली. त्यांच्याविषयी सहानुभूती व्यक्त करीत यांच्यावरील अन्याय दूर व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. आणि त्यासाठी संसदेत सरकारवर शाब्दिक हल्ला केला. हे सर्व एकीकडे आणि आंदोलन एकीकडे असे चित्र निर्माण करण्यात आले. मीडियाने दोन्हीकडची दखल घेतली नाही. म्हणजे हवी तेवढी दखल घेतली नाही. ही सर्व लढाई सोशल मीडियावरच चालली. प्रियंका गांधी यांनी प्रेसला विचारले की, मला प्रश्न विचारण्याऐवजी धर्मेंद्र प्रधान केव्हा राजीनामा देणार असे तुम्ही विचारले का ? विद्यमान सरकारच्या कारकिर्दीत जे काही घडले त्यावर प्रश्न विचारले का? यावर अर्थातच प्रेस निरूत्तर होता. काँग्रेस आणि इंडिया आघाडी ने पेपर फुटीच्या मुद्द्यावर आतापर्यंत जे काही केले त्यावर पाणी फिरवायचे होते का असेही प्रश्न काहींनी उपस्थित केलेले या आंदोलनादरम्यान आढळले. सत्तांतर हवे पण ते शासक पक्षाचे नव्हे तर विरोधी पक्षाचे हवे अशी योजना असण्याची शक्यता या आंदोलनामध्ये होती अशीही शंका काही विचारवंतांनी उपस्थित केलेली आहे. त्यातील खरे खोटे यथावकाश पुढे येईलच तोवर प्रतीक्षा करावी लागेल.

एवढे खरे की ह्या सगळ्या शक्यता तरुणांनी उधळून लावल्या आणि आंदोलन पूर्णपणे आपल्या हातात घेतले. त्यांचा खऱ्या अर्थाने हा विजय आहे. देशभरातून विविध परिवर्तनवादी संघटनांचे कार्यकर्ते, दिल्लीत येऊन पोहोचले होते. महाराष्ट्रात आणि देशात सगळ्या ठिकाणी धरणे मोर्चे निवेदने असा कार्यक्रम गांधींच्याच मार्गाने चालू होता. कोणीही हिंसक भूमिका घेतली नाही. जसजसे हे आंदोलन पुढे जाईल तसतसे समर्थक पुढे येत होते. ते कोणत्याही पक्षाचे नव्हते तर तरुणाईचे समर्थक म्हणून पुढे येत होते हेही या आंदोलनातून सिद्ध झाले आहे. तरुण यशस्वी झाले. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला. तरुणांचे अंतिम उद्दिष्ट साध्य झाले. आता पुढे काय असे प्रश्न स्वाभाविकपणे उपस्थित होतात. शिक्षणाच्या शुद्धीकरणाचा मुद्दा सगळ्यात महत्त्वाचा आहे. परंतु आजची जी व्यवस्था आहे, त्यांचे जे शैक्षणिक धोरण आहे तेच ती व्यवस्था पुढे चालवेल. एक प्रधान गेले दुसरे प्रधान येतील. कार्यपद्धतीत भलेही फरक पडेल परंतु धोरणात्मक निर्णय बदलणार नाहीत. जी शासक पक्षाची आणि त्यांच्या मित्र पक्षांची धोरणे आहेत. ती शिक्षणाचा खेळखंडोबा करणारी असून एकूणच त्यातील फोलपणा आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाचा अजेंडा पुढे नेण्याचा आटापिटा स्पष्टपणे जाणवत असल्याने ते धोरण बदलण्याची शक्यता अशा प्रकारचे आंदोलन रेटून नेले तरच आहे. एकूणच संविधानाधारित शिक्षणाचा पाठपुरावा याच पध्दतीने करावा लागेल.फक्त नीट परीक्षा पध्दतीत बदल आणि मंत्र्यांचा राजीनामा एवढ्यावर हा प्रश्न सुटणार नाही हे वास्तव अल्प विजयाने हुरळून न जाता लक्षात घेणे गरजेचे आहे.

या आंदोलनाचे श्रेय नि:संशय तरूणांचे आहे ज्यांचा कुठलाही पक्ष नाही कुठलाही झेंडा नाही. मात्र राहुल गांधी आणि काँग्रेस ने हा मुद्दा सुरुवातीपासून उचलून धरला. देशभर जागृती केली. लाखोंचे मेळावे केले आणि आंदोलने केली त्यांनी या आंदोलनाचे श्रेय घेऊ नये म्हणून शासक पक्षाने आता राहुल गांधी यांच्या विरुद्ध मोर्चे काढण्याचे काम सुरू केले आहे. काँग्रेसच्या कार्यालयावर मोर्चा नेऊन राहुल गांधींचा निषेध करणे आणि त्यांच्या छायाचित्राला जोडे मारणे. असे कार्यक्रम कोल्हापूर, बुलढाण्याला व शिरपूरला झाले आहेत. साऱ्या महाराष्ट्रात ते होतील. तसा त्यांना आदेश आलेला असावा.

राहुल गांधी देशद्रोही आहेत आणि पंतप्रधानांच्या निवासासमोर आंदोलन करून त्यांनी आमच्या नेत्यांची बदनामी केली आहे तसेच देश विरोधी कृत्य केले आहे असे या कार्यकर्त्यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे. म्हणूनच विरोधी पक्षांच्या आंदोलनातील हवा काढून घेणे त्यांचा अवकाश दुसऱ्यांच्या हातात देण्याचा प्रयतक करणे,श्रीराम मंदिराच्या दान पेटीतील करोडो रुपयांच्या चोरीची चर्चा, सोने चांदीच्या चोरीची चर्चा थांबावी, किंवा त्या मुद्द्यावरून दुसरीकडे लक्ष केंद्रित व्हावे. त्यावर सभागृहात देखील चर्चा होऊ नये याची काळजी आंदोलनाच्या माध्यमातून घेण्यात आल्याची काहींना शंका आहे. एस आय आर वर फारसे कोणी बोलू नये हा सुद्धा एक मुद्दा आहे. असे अनेक प्रश्न दीर्घकाळ चिघळलेल्या आंदोलनातून भविष्यात निर्माण होणार असे दिसते. तसे नसेल तर सत्ता पक्षासहित त्यांना मदत करणाऱ्या सर्वांचा आणि आंदोलन उभे करणारांचा प्रामाणिक आणि अप्रामाणिक हेतूही कालांतराने स्पष्ट होणार आहे.

# जेन झी चा वणवा

**डॉ. सुकत खांडेकर**
**मो.९५९४२२४०००**

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशांनी बेरोजगार आणि अहोरात्र सोशल मिडियावर पडललेल्या तरूणांना झुरळं म्हणून संबोधल्यावर अमेरिकेत बोस्टनमधे शिकत असलेल्या अभिजीत दीपकेने कॉक्रोच जनता पार्टीची घोषणा केली. इंस्टाग्रामवर अभिजीतच्या घोषणेला देशातून तरूणाईचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अडिच कोटी फॉलोअर्स भेटले. नीट परीक्षा पेपर फुटीची जबाबदारी स्वीकारून धर्मेंद्र प्रधान यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी अभिजीतने थेट मागणी केली. बावीस लाख विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना प्रचंड मानसिक त्रास झाला, नैराश्यातून २४ मुलांनी आत्महत्या केल्या, गेल्या दहा वर्षात १५२ पेपर फुटीच्या घटना घडल्या. त्याचे उत्तरदायित्व कोण स्वीकारणार ? असा थेट प्रश्न त्यांनी सरकारला विचारला. कोणतेही संघटन नसलेली आणि सोशल मिडियावर स्थापन झालेली पार्टी काय करू शकणार, अशा भ्रमात मोदी सरकार होते. सरकारमधे मंत्री म्हणून कोणाला ठेवायचे व कोणाला हटवायचे हे तुम्ही कोण सांगणार, अशी मानसिकता सत्ताधाऱ्यांमधे दिसून आली. जंतरमंतरवर आंदोलन चालू असताना कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाची भाजपाने यथेच्छ टिंगल टवाळी केली. मोदी सरकार सत्तेवरून उलथवायला निघालेत, त्यांना देशात अराजक माजवायचे आहे, आंदोलनात गुंड व दहशतवादी घुसले आहेत, पाकिस्तानमधून त्यांना रसद पुरवली जात आहे, आंदोलनामागे चीन व अमेरिकेचा हात आहे अशा वाट्टेल त्या कंड्या सत्ताधारी पक्षातून आणि गोदी मिडियातून पिकवल्या गेल्या. जंतरमंतरवरील आंदोलन बदनाम करण्याचा, भरपूर प्रयतक झाला. लडाखचे नेते सोनम वांगचूक यांना भल्या पहाटे पांढऱ्या चादरीत गुंडाळून उचलून नेण्यात आले. संसद भवनवर मोर्चा काढणाऱ्या मुला मुलींना खिळे ठोकलेल्या लाठ्यांनी बदडण्यात आले. साध्या वेशातील पोलिसांनी आंदोलकांवर बेछूट लाठीमार केला. गणवेशातील पोलिसांनी मुलांच्या मोर्चावर अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या. मुलींचे कपडे फाडले, त्यांचे विनयभंग झाले. परस्परांवर दगडफेक झाली. जंतरमंतर भोवती व संसद मार्गावर लावलेल्या बरीकेटसमधे वीजेचे करंट सोडण्यात आले. जंतरमंतरवर जेवण- खाणाची रसद तोडण्याचा प्रयतक झाला. हॉटेल व रेस्टॉरंट मालकांना धमकविण्यात आले. जंतरमंतर व संसद भवनकडे येणारे रस्ते बंद केले गेले. अठरा मेट्रो स्टेशन्स बंद ठेवली. आंदोलकांचा कोणाशीही संवाद होऊ नये म्हणून इंटरनेट सेवा खंडीत करण्यात आली. पंधरा ते पंचवीस वयोगटातील विद्यार्थी हे जणू देशद्रोही आहेत, असे चित्र रंगविण्याचा प्रयतक झाला. दिल्ली पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या निर्घृण लाठीहल्ल्यानंतर संपूर्ण देशभरात सरकारच्या विरोधात संतापाची लाट निर्माण झाली. देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो युवक व विद्यार्थांचे जथेच्या जथे मिळेल त्या मार्गाने व मिळेल त्या वाहनाने दिल्लीला निघाले. चलो संसद मोर्चात तर एक लाखावर युवक सामील झाले. संपूर्ण देशात सरकार विरोधात उस्फूर्त जनआंदोलन उभे राहीले. दिल्ली, मुंबई, पुणे, नागूपर, छत्रपती संभाजीनगरसह देशातील दिडशे शहरात तरूणाई हजारोंच्या संख्येने भाजपा सरकारचा धिक्कार करण्यासाठी रस्त्यावर उतरली. कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांनी दाखवलेली हिम्मत, ताकद आणि देशभर पेटलेला असंतोषाचा वणवा यामुळे दिवसानंतर मोदी सरकारचा अहंकार गळून पडला. जेन झीपुढे सरकारला झुकावे लागले, धर्मेंद्र प्रधानांना शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. युवाशक्तिची अभेद्य एकजूट व देशभरात झालेले शक्तिप्रदर्शन यापुढे सरकारला नमावे लागले. गेल्या बारा वर्षात मोदी सरकारवर प्रथमच एवढी नामुष्की आली. कोटी कोटी उधळून सत्ता मिळवली, खोकी देऊन विरोधी पक्षात तोडफोड केली, इडी, सीबीआय, इनकम टक्ससारख्या यंत्रणा वापरून विरोधी पक्षाचा आवाज दाबला, सतत इव्हेंट व मार्केटींग करून स्वत:ची प्रतिमा उजळविण्याचे काम केले, त्यावर जेन झीच्या आंदोलनाने पाणी ओतले. तुम्ही देशाचे सेवक आहात, हुकूमशहा नाही, असा संदेश या आंदोलनाने सरकारला दिला आहे.

दिल्ली पोलिसांनी विद्यार्थी- विद्यार्थिनींवर आमानुष लाठीमार केला, अनेकांची डोकी फुटली, चेहरे रक्तबंबाळ झाले, पाठी, कंबर सुजली, शरीरावर जखमा झाल्या, त्याला कोण जबाबदार आहे. दिल्ली पोलीस हे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीत आहे. केंद्र सरकारला त्याची जबाबदारी झटकटा येणार नाही. कोवळ्या मुलांच्या मोर्चावर लाठीमार करताना थेट खिळे ठोकलेल्या लाठया का वापरल्या ? पाण्याचे फवारे का सोडले नाहीत ? पेलेट गन्सचा वापर करायचा आदेश कोणी दिला ? साध्या वेशातील पोलीसांना मुलांवर लाठ्या चालविण्याचे अधिकार कोणी दिले ? अनेक पोलिसांच्या गणवेषावर नावाची पट्टीच नव्हती , हे कशासाठी ? ज्या पोलिसांनी मुलींचे कपडे फाडले व त्यांच्या श्रीमुखात लगावली त्यांच्यावर कारवाई काय होणार ? आंदोलकांना पांगविण्यासाठी किती व कुठे- कुठे अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या ? पोलिसांच्या क्रूर कारवाईची न्यायालयीन चौकशी होईल का?

वीस जून रोजी कॉक्रोच जनता पार्टीने शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी जंतरमंतरवर आंदोलन सुरू केले. या आंदोलनाला दिल्लीतून व देशातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळेल अशी सरकारला कल्पना नव्हती. आंदोलकांच्या हाती केवळ संविधान, बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो व तिरंगा ध्वज होता. याच मैदानात सोनम वांगचूक यांनी २८ जूनला उपोषण सुरू केल्याने जेन झी आंदोलनाला नैतिक बळ प्राप्त झाले. उपोषणाने सोनम यांची प्रकृती खालावू लागली व जंतरमंतरकडे गर्दीचा ओघ वाढू लागला. काँग्रेस, आप, उबाठा सेना, राष्ट्रवादी काँग्रेस (शप ), सपा, आदी विरोधी पक्षांचे नेते येऊ लागले. नंतर चित्रपट सृष्टीतील कलाकारांची रांग लागली. शरद पवार, उध्दव ठाकरे, सुप्रिया सुळे, अरविंद केजरीवाल, मुख्यमंत्री थलपती विजय, मेहबुबा मुफ्ती, डिम्पल यादव असे असंख्य नेते आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी आले. ब्रिटन, जर्मनी, नेदरलँड, आयर्लंड. फ्रान्स, कनडा, अमेरिका आदी देशात भारतीय विद्यार्थी रस्त्यावर उतरले. विदेशातील मिडियामधेही भारतातील जेन झी आंदोलनाला मोठी प्रसिध्दी मिळू लागली. आंदोलन हे कॉक्रोच जनता पार्टीच्या कक्षेबाहेर गेले. सरकारविरोधात सर्वत्र उग्र प्रदर्शन सुरू झाले. राहुल गांधींनी थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर आंदोलन केले व शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची व मोदी - शहा यांच्या माफीनाम्याची मागणी चालू ठेवली. सोनम वांगचूक यांचे उपोषण मध्यरात्री का सोडविण्यात आले? त्यांचे उपोषण सोडवायला दोन मंत्री इस्पितळात का गेले ? पंतप्रधानांनी व्हिडिओवरून युवापिढीविषयी आपणास खूप चिंता वाटते हे मध्यरात्रीनंतर का सांगावे ? वांगचूक यांच्या पतकीने राहुल गांधींनी पंतप्रधानांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करायला नको होते हे सांगण्याची गरज काय ? सोनम वांगचूक व दीपके यांच्यात मतभेद व्हावेत व अंतर पडावे यासाठी सरकारने काळजी पूर्वक प्रयतक केले. भाजपाशी संलग्न असलेल्या विद्यार्थी संघटनांची मदत घेऊन आंदोलनात फूट पाडता येईल का. असाही प्रयतक झाला. आंदोलक मुले-मुली सुशिक्षित होत्या, त्यांचे आई वडिल, आजी आजोबाही त्यांना पाठिंबा देण्यासाठी जंतरमंतरवर आले होते . त्यांच्या घोषणा , पोस्टर्स कल्पक होती. सोशल मिडयाचा वापर करण्यात सारे माहिर होते. ज्या पोलिसांनी लाठ्या मारल्या, त्यांचे दुसऱ्या दिवशी त्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केले.

आम्ही एका मंत्र्याच्या राजीनाम्यानंतर थांबणार नाही, पोलिसांचाही हिशेब केला जाईल असे क्रॉक्रोच जनता पार्टीने जाहीर केले आहे. अमानुष वागणूक देणाऱ्या पोलिसांचे व्हिडिओ पुरावे म्हणून तयार ठेवले आहेत. पेपर फुटीनंतर ज्या मुलांनी आत्महत्या केल्या, त्यांच्या परिवाराला एक कोटी नुकसान भरापाई देण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचे सरकारने कबुल केले आहे. गेल्या बारा वर्षात विरोधी पक्षांना जमले नाही ते जेन झी ने करून दाखवले. पोलीस, इडी, सीबीआयला आम्ही घाबरत नाही, हे दाखवून दिले. झुरळांचा वणवा सत्ताधाऱ्यांच्या खुर्चीपर्यंत पोचू शकतो हे दिसले. अभिजीत दिपके याने म्हटले आहे- लोकशाहीची पहाट झाली आहे. देशातील जनता जागी झाली आहे. ये तो पहिला विकेट है, यहीं नहीं रूकेंगे, अभी तो बस शुरूवात हुई है.



# शहाद्यातील विविध रस्त्यांवरील खड्डे बुजवून रस्त्यांची दुरुस्ती करा- उबाठा

**शहादा, दि. २५(प्रतिनिधी)- शहरातील विविध रस्त्यांवरील खड्डे तात्काळ बुजवून रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी या मागणीचे निवेदन उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नंदुरबार जिल्हा प्रमुख अरूण चौधरी यांनी नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांना दिले.**

या निवेदनात म्हटले आहे की, शहादा शहरातील अनेक मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. अलीकडील पावसामुळे या खड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून लहान-मोठे अपघात वारंवार घडत आहेत. येत्या काही दिवसांत विविध धार्मिक व सार्वजनिक सण-उत्सव सुरू होत असल्याने शहरात नागरिकांची व वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ वाढणार आहे. अशा परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील सर्व रस्त्यांवरील खड्डे तात्काळ बुजवून आवश्यक त्या ठिकाणी डागडुजी व दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर करण्यात यावीत. आपण या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागास आवश्यक सूचना देऊन रस्त्यांची दुरुस्ती त्वरित करावी. अन्यथा, नागरिकांच्या हितासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनावर शहर प्रमुख सागर मधुकर चौधरी, तालुका संघटक गणेश चित्रकथे, माजी नगरसेवक विनोद चौधरी, सुभाष आण्णा पाटील, भगवान अलकरी, दीपक साळी, रमेश कुवर, पंडित माळी, श्रीकृष्ण शिनकर, दीपक खेडकर, संजय चौधरी, धनराज निकुंभे, किशोर जोशी आदी उपस्थित होते.



# पुज्य साने गुरुजी महाविद्यालयात सीड आर्ट प्रदर्शन उत्साहात संपन्न

**शहादा,दि.२५ (का.प्र.) - पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शहादा येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने मसीड आर्ट प्रदर्शनफ मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये जैवविविधतेबाबत जागरूकता निर्माण करणे, विविध वनस्पतींच्या बियांची ओळख करून देणे तसेच सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.**


या प्रदर्शनात बी.एस्सी. व एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध वनस्पतींच्या बियांचा वापर करून अत्यंत आकर्षक कलाकृती, निसर्गचित्रे, सजावटीच्या वस्तू तसेच दुर्मीळ व औषधी वनस्पतींच्या बियांचे संकलन सादर केले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन घडविणाऱ्या या प्रदर्शनाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने भेट देऊन उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एम. के. पटेल यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या सीड आर्ट कलाकृतींचे सूक्ष्म निरीक्षण केले.विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे आणि मेहनतीचे विशेष कौतुक करताना ते म्हणाले, अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि जैवविविधतेविषयी आदर निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल. या प्रसंगी वरिष्ठ प्राध्यापक डॉ. सतीश भांडे, डॉ. अरविंद कांबळे, डॉ. अनिल बेलदार, डॉ. प्रशांत जगताप, डॉ. मृणाल जोगी, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. जगदीश चव्हाण, डॉ. सुधाकर उजगरे, डॉ. गोपाल गवई आणि डॉ. योगेश वासू यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन प्रा. डॉ. सुनिल पाठक, प्रा.विजया पाटील, प्रा.निलेश आठवले आणि डॉ.महेश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

**प्रकाश में आज इन्कलाब**




जितेंद्र, जयाप्रदा, प्राण, कादरखान, शक्तीकपूर, रोहिणी हट्टंगडी

## शब्दकोडे क्रमांक : २४२१



**आडवे शब्द :** १.पाण्याचा असलेला संचय ३.विद्यार्थ्यांची घेतली जाणारी चाचणी ६.मित्र किंवा सखा९.उत्पादन होणारे ठिकाण ११.पहाटे गवतावर पडणारे पाण्याचे थेंब १३.एखादे मोठे किंवा धाडसी कृत्य १४.मऊ किंवा कडक नसलेले १७.दरोडा किंवा मोठी चोरी १९.बस्तान बसणे किंवा स्थिर होणे २२.मोठा भाऊ २१.हस्त २३.निमित्त किंवा हेतू २६.आश्चर्य किंवा अचंबा २८.थ्री इडियट सिनेमातील एक नायक फक्त नाव ३०.लग्नात वाजवले जाणारे मंगल वाद्य ३२.मज ३३.आजार किंवा मनाची भावना ३४.पशू किंवा प्राणी ३७.डरकाळी फोडणारा प्राणी ३८.म्हशीचा जोडीदार ४०.वस्तूचे बाह्य रक्षण करणारे आवरण ४२.नौका ४३.हिंदीत-मार्ग ४४.ज्यावर वाद किंवा चर्चा सुरू आहे असे ४७.एक संख्या ४९.दोन पक्षांमध्ये झालेला करार किंवा समेट ५२.ओसाड ५४.अमिताभ बच्चन,गोविंदा रजनीकांत यांचा एक सिनेमा ५६.तीव्र इच्छा किंवा आकांक्षा ५७.दोन व्यक्तींमधील मतभेद किंवा वाजलेले खटके ५८.लोकांचा मोठा गोंधळ किंवा आवाज **उभे शब्द :** १. अतिशय वेगाने २.लहान ४.रिता ५.समुद्राच्या पाण्यात आढळणारे मिठाचे प्रमाण ६.पूर्वी टेहळणी करण्यासाठी वापरतात तो बुरुज,'चार * * *' अठराव्या शतकातील एक ऐतिहासिक वास्तू ७.आमटी किंवा वरण वाढण्यासाठी वापरले जाणारे छोटे स्वयंपाकघरातील भांडे ८. दुधाचे दहीत रूपांतर करण्यासाठी घातले जाणारे ताक १०.मोठे घराणे, कुळ किंवा वंशावळ १२.तिखट मिठाची पुरी १४.नाव १६.राजवाडा १८.नारायण रावांनी अंतिम समयी आल्या काकांना रघुनाथ रावांना मारलेली २२.पत्ते २४.इंग्रजीत-धाव २५.कपि २७.देश २९.एक इंग्रजी-मद्य ३०.पहाट ३१.हुशार ३४.बारीक-विरुद्ध ३५.वस्ती ३६.भरीव नसलेला ३८.एक नक्षत्र ४१.टोक ४५.धोका ४६.एखाद्याचे गुणगान करणे ४८.सोबत ५०.वजनास भारी नसलेला ५१.कंबर ५३.हिंदीत-सर्व ५५.नंतर

**शब्दकोडे क्रमांक : २४२० चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | का | श | आ | म | टे | | प्र | मो | द | | ब |
| क | | त | | हा | | चो | | स | | मो | ल |
| र | व | | स | ल | वा | र | क | मी | ज | | रा |
| ण | | मै | दा | | ट | | ह | | ब | दा | म |
| | जिं | दा | | प्र | | का | र | क | | स | |
| अ | | न | र | सं | हा | र | | ड | क | | अ |
| व | ज | | सा | ग | | ना | ह | क | | स | पा |
| ता | ल | मे | ळ | | मा | मा | | ना | म | मा | त्र |
| र | | हं | | ना | य | | सं | थ | | न | |
| | आ | दी | ना | थ | | सा | ग | | क | ता | र |
| दे | व | | रा | | टो | ल | | ज | ळ | | द |
| शी | | आ | ज | त | क | | स | रा | स | री | |








# विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामार्फत अवयवदान विषयक कार्यशाळा संपन्न

**नाशिक, दि. २५ - समाजात अवयवदानाबाबत जनजागृती वाढवून अधिकाधिक गरजू रुग्णांना नवजीवन मिळावे, या उद्देशाने उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली हब अँड स्पोक मॉडेल अंतर्गत विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक आणि झेडटीसीसी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गोविंदनगर येथील हॉटेल ट्रीट येथे अवयवदान विषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.**

कार्यशाळेत नाशिक विभागातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध रुग्णालयांतील तसेच महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयांतील वैद्यकीय अधिकारी, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना संलग्न रुग्णालयांतील तज्ज्ञ डॉक्टर, अवयव प्रत्यारोपण समन्वयक, परिचारिका तसेच अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यशाळेचे उद्घाटन उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ डॉ. कपिल आहेर यांच्या हस्ते झाले. यावेळी विशेष कार्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग डॉ. सचिन जाधव, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा डॉ. अभिजित फडणीस, डॉ.अमोल भावणे(नागपूर), सौ. आरती गोखले (पुणे), जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतीश शिंपी, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण पवार, डॉ. योगेश चिते तसेच डॉ. राजेंद्र सावंत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये अवयवदान व अवयव प्रत्यारोपण क्षेत्रातील तज्ज्ञांनी मेंदूमृत्यू निदान प्रक्रिया, अवयवदानाची वैद्यकीय व कायदेशीर कार्यपद्धती, अवयवदानातील नैतिक मूल्ये तसेच महाराष्ट्रातील अवयवदान चळवळीची सद्यस्थिती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी मान्यवरांनी मृत्यूनंतरचे अवयवदान हे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन देणारे सर्वोच्च मानवसेवेचे कार्य आहे, असे प्रतिपादन करत समाजामध्ये अवयवदानाबाबत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहन केले. तसेच उपस्थितांनी अवयवदानाची प्रतिज्ञाही घेतली.

यानंतर आयोजित पॅनेल चर्चेमध्ये अवयवदान प्रक्रियेतील वैद्यकीय, कायदेशीर व सामाजिक पैलूंवर सखोल चर्चा करण्यात आली. सहभागी प्रतिनिधींनी विचारलेल्या विविध प्रश्नांना तज्ज्ञांनी समाधानकारक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले.

समारोपप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुण पवार यांनी उपस्थित मान्यवर, तज्ज्ञ, सहभागी प्रतिनिधी तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थांचे आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, कर्मचारी तसेच झेडटीसीसी, पुणे यांच्या सहकार्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त करून आयोजकांचे अभिनंदन केले.

## निष्ठावंत आत्माराम नगराळेंची

# राष्ट्रवादीच्या काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**शहादा, दि.२५(का.प्र.) - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आणि पक्षविस्ताराला गती देण्यासाठी जयनगर ता.शहादा जि.नंदुरबार येथील निष्ठावंत कार्यकर्ते आत्माराम नगराळे यांची मसामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षफ पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.**



पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष पंडित प्रल्हाद कांबळे यांनी याबाबतचे अधिकृत नियुक्तीपत्र जारी केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आत्माराम नगराळे यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या निरंतर कार्याची आणि पक्षनिष्ठेची दखल घेत पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या सूचनेनुसार ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.आपल्या नियुक्तीपत्रात प्रदेशाध्यक्ष पंडित प्रल्हाद कांबळे यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, नगराळे यांच्या दीर्घ अनुभवाचा पक्षाला मोठा फायदा होईल. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार आणि पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी ते प्रामाणिकपणे प्रयतक करतील. तसेच, समाजातील सर्व वंचित व उपेक्षित घटकांना एकत्र आणून संघटन मजबूत करण्यासाठी ते सर्वशक्तीनिशी कार्य करतील, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.आत्माराम नगराळे यांच्या या निवडीमुळे नंदुरबार जिल्हा व खान्देश परिसरात पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडीबद्दल पक्षातील वरिष्ठ नेते, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत; शेतकऱ्यांमध्ये समाधान

शिरपूर दि.२३ (का.प्र.) : गेल्या तीन दिवसांपासून शहरासह संपूर्ण परिसरात संततधार पाऊस सुरू असून अद्याप सूर्यदर्शन झालेले नाही. उशिराने का होईना, पण योग्य प्रमाणात सुरू झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जून महिन्यात कमी झालेल्या पावसामुळे चिंतेत असलेल्या बळीराजाला आता दिलासा मिळाला असून खरीप पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

सलग पडणाऱ्या पावसामुळे जमिनीत खोलवर ओल निर्माण झाली आहे. त्यामुळे कापूस, सोयाबीन, मका, बाजरी तसेच इतर खरीप पिकांच्या वाढीस पोषक वातावरण तयार झाले आहे. आतापर्यंत पावसाअभावी मरगळलेल्या पिकांमध्ये पुन्हा जोम दिसून येत असून शेतकरी शेतीच्या कामात उत्साहाने गुंतला आहे. विहिरी, बोअरवेल, शेततळी आणि लहान-मोठे जलसाठे भरू लागल्याने आगामी काळातील पाण्याची बेगमी होणार आहे. हवामान अनुकूल राहिल्यास खरीप हंगामासाठी हा पाऊस अत्यंत लाभदायक ठरणार असल्याचे कृषी क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. शेतीच्या दृष्टीने हा संततधार पाऊस वरदान ठरत असल्याने बळीराजाच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.



# नंदुरबारला अकाउंटिंग म्युझियमचे सौरभ अजमेरांच्या हस्ते उद्घाटन

**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- शहर व जिल्ह्यात सीए (सनदी लेखापाल ) क्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे आणि मार्गदर्शक ठरणारे अकाउंटिंग म्युझियम अर्थात लेखा संग्रहालयाचे शानदार उद्घाटन नंदुरबार येथे करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा तीन राज्यांच्या सीए असोसिएशनचे प्रमुख चेअरमन सौरभ अजमेरा यांच्या हस्ते जीटी पाटील महाविद्यालयात लेखा संग्रहालयाचे शानदार उद्घाटन झाले.**

या उद्घाटन सोहळ्यास व्हाईस चेअरमन रिकीन पटेल, सेक्रेटरी बिसन शाह, राकेशकुमार शहा, राजेश अग्रवाल, पिंकी केडिया, विजेंद्र जैन, सोनी सोनार आदी मान्यवर उपस्थित होते. नंदुरबार सीपीचे अध्यक्ष सीए कृष्णा गांधी, उपाध्यक्ष सीए शुभम अग्रवाल यांनी संयोजन केले. जीटी पाटील महाविद्यालयाच्या सहकार्याने अकाउंटिंग म्युझियमचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना सीए असोसिएशनचे चेअरमन सौरभ अजमेरा यांनी सांगितले की, यत्र, तत्र, सर्वत्र याप्रमाणे सीए संघटनेचे काम सुरू आहे. ग्राहकांच्या गरजा ओळखून कार्य करावे ध्येय, उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयतक करावे. सनदी लेखापाल म्हणून समाजात असलेली प्रतिष्ठा अग्रणी ठेवून भविष्यात कार्य करायचे आहे.

श्रमाशिवाय प्रतिष्ठा नाही. आम्ही नशिबवान आहोत की, भारत देशाच्या अर्थव्यवस्थेत सनदी लेखापाल अर्थात सीए यांचे बहुमूल्य योगदान आहे. डिसेंबर महिन्यात विभागीय कॉन्फरन्स दिव्यदृष्टी मध्ये सहभागी होण्याचे आवाहन सीए सौरभ अजमेरा यांनी केले. सेक्रेटरी बिसन शाह यांनी सांगितले की, महाकुंभाप्रमाणे २०१४ नंतर म्हणजे बारा वर्षानंतर नंदुरबारला सनदी लेखापालांचा महाकुंभ होत आहे.

# जीवनात संत कबीराचा एक तरी दोहा अनुभवावा-डॉ अजित कुमार जयस्वाल

साक्री, दि.२६ (प्रतिनिधी )- मानवी जीवनात संत कबीराचा एक तरी दोहा अनुभवावा,त्याचा आपल्या जीवनात अंगीकार करावा असे प्रतिपादन प्राचार्य डॉ अजित कुमार जयस्वाल यांनी केले.जे.के.शाह आदर्श महाविद्यालय, निजामपूर येथे कवी डॉ दिलीप लोखंडे कबिराकार यांच्या लोक संवादक संत कबीर या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ अजित कुमार जयस्वाल बोलत होते. प्रथम लेखक डॉ दिलीप लोखंडे कबिराकार व भाषांतर कार प्रा.डॉ.अजबराव इंगळे यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ सुधाकर जाधव यांनी पुस्तकावर भाष्य करताना सांगितले की, पहिल्यांदाच संत कबीराचे जीवनचरित्र इंग्रजी भाषेत वाचकांना उपलब्ध करून देण्यात आले आहे, त्यामुळे इंग्रजी भाषिक या ग्रंथाकडे वळतील.पत्रकार रघुवीर खारकर म्हणाले की,संत कबीराचे जीवनचरित्र सर्व सामान्य माणसाला प्रेरणा देणारे आहे,प्रा.डॉ. किशोर सोनवणे यांनी पुस्तक निर्मिती मागची पार्श्वभूमी विशद केली. प्राचार्य डॉ अजित कुमार जयस्वाल आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, संत कबीरांनी त्यांच्या दोह्यातून दिलेला संदेश काल सापेक्ष आहे, समाजपरिवर्तनासाठी उपयोगी आहे, भाषांतरकार प्रा.डॉ.अजबराव इंगळे यांनी सांगितले की, कबीराच्या दोह्याचे इंग्रजी भाषेत भाषांतर करणे अवघड काम आहे परंतु अभ्यासाअंती ते शक्य झाले, यावेळी लेखक डॉ दिलीप लोखंडे कबिराकार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा.वसावे यांनी केले.प्रकाशन सोहळ्यास महाविद्यालयाचे प्राध्यापक, इतर कर्मचारी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

**तमाम जनतेस, बँकांचा, हित संबंधितांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे धुळे ता. जि. धुळे येथील नगर भुमापन क्रमांक १२०२८ चे एकूण क्षेत्र २७७.५० चौ. मी. या पैकी पुर्वेकडील भागाचे सामाईक क्षेत्र ३४.६९ चौ. मी. १२ बाय ६०=७२० चौरस फुट सत्ता प्रकार क अशी बांधीव मिळकत त्यांची चतु:सिमा नकाशा रेकॉर्ड प्रमाणे.**

येणे प्रमाणे मिळकत ही भारती प्रमोद जोशी वगैरे २ रा. मानिक नगर, धुळे यांचे मालकीची व ताबे उपभोगातील आहे.सदर मिळकत ही आमचे पक्षकार परवीन बानो मो. सुलतान रा. माधवपुरा धुळे यांनी कायम खरेदीचा सौदा केला असून बयाणापोटी रक्कम दिलेली आहे. सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार हे संबंधीत व्यक्तीशी पूर्ण करणार आहेत.

**तरी सर्वांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,** सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, सबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच वा वारस हक्क, खावटी दृ. म. जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे ०७ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणून खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीत करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दि. २५/०७/२०२६

**ॲड.परवेज निसार तांबोळी**
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे मो. ७०२०३८१३९४



## CHANGE NAME

I Have Changed Of My Name
**SHAH AFRIN BI SABIR**
To
**AFRIN VASIM FAKIR**
As Per My Documents
Add - Mukkam Nimkhedi Post Varkhedi Dhule-424301 (M.S.)

## CHANGE OF NAME

I Have Changed My Name From Old Name
**AAISHA SIDDIQUA KHALIL AHMED**
To New Name.
**AAISHA SIDDIQUA KHALEEL AHMED ANSARI**
As Per Documents
Add - Ghar No.23 Firdos Nagar Nandi Road Dhule.

## CHANGE OF NAME

I Have Changed My Name From Old Name
**KHALIL AHMED MOHAMMED TAYYAB**
To New Name.
**KHALEEL AHMED MOHAMMAD TAYYAB ANSARI**
As Per Documents
Add - Ghar No.23 Firdos Nagar Nandi Road Dhule.

## CHANGE OF NAME

I Have Changed My Name From Old Name
**AAISHA SIDDIQUA KHALIL AHMED JULAHA**
To New Name.
**AAISHA SIDDIQUA KHALEEL AHMED ANSARI**
As Per Documents
Add - Ghar No.23 Firdos Nagar Nandi Road Dhule.

## CHANGE OF NAME

I Have Changed My Name From Old Name
**SHAMSUDDOHA ALIMULLAH**
To New Name.
**SHAMSUDDOHA AZIMULLAH ANSARI**
As Per Documents
Add - 398-882 Firdos Nagar Nandi Road Rat Rani Hotel Dhule.

## CHANGE OF NAME

I Have Changed My Name From Old Name
**JULAHA KHALIL AHMED MOHAMMED TAYYAB**
To New Name.
**KHALEEL AHMED MOHAMMAD TAYYAB ANSARI**
As Per Documents
Add - Ghar No.23 Firdos Nagar Nandi Road Dhule.



## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ६४६/२०२६

**१) श्रीमती हिराबाई काशिनाथ ईशी २) दिपमाला कैलास शिरसाठ**
नं. १ व २ रा.वरुळ ता. शिरपूर जि. धुळे ... **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत काशिनाथ रामदास ईसी हे दि. ०९/०७/२०२४ रोजी मौजे वरुळ ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून आता अर्जदार नं. १ व २ यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी मयताच्या वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने व अर्जदार नं. १ व २ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १०/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. २२/०७/२०२६

आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

### शिंदखेडा येथील म.तहसिलदार सो. यांचे न्यायालयात

**श्रीगिरधर रुपला कोळी,**
**वय ७२, धंदा मजुरी रा.परसामळ ता. शिंदखेडा .. अर्जदार**

**विरुद्ध**

**ग्रामसेवक /तथा**
जन्म/मृत्यू निबंधक ग्रामपंचायत ता. शिंदखेडा **... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांचे भाऊ कै. एकनाथ रुपला कोळी यांचा मृत्यू परसामळ ता. शिंदखेडा जि. धुळे येथे झाला असल्याने अर्जदार यांनी दि. १३/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(२)(३) प्रमाणे जन्म नोंद होणेबाबत आदेश मिळणेकरीता अर्ज दाखल झालेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, कै.एकनाथ रुपला कोळी रा. परसामळ ता. शिंदखेडा यांच्या मृत्यू नोंद प्रकरणी कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी वर्तमानपत्रातील प्रकटन प्रसिद्धी दिल्यापासून १५ दिवसांच्या आत शिंदखेडा येथील मे. न्यायालय कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार शिंदखेडा येथे स्वत: अगर वकील प्रतिनिधी मार्फत उपस्थिती होवून लेखी तक्रार सादर करावी. तसे मुदतीत कोणाची तक्रार न आल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांस मृत्यू नोंद आदेश देण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार, शिंदखेडा**

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ६०३/२०२६

**१) धनराज मुरलीधर कदम, २) विठोबा मुरलीधर कदम**
**३) भारती संजय मराठे ४) ललिता पितांबर मराठे... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै. विमल मुरलीधर कदम हे मौजे जुनी देना बँक शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १०/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. २२/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ५८९/२०२६

**१) सुरेखाबाई विलास मराठे, २) स्वप्निल विलास पवार,**
**३) उदय विलास पवार ४) योगिनी विलास मराठे... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै. विलास भटू मराठे हे मौजे विखरण बु. ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०६/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. २२/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ७३/२०२६

**१)सुभाष अवचित पाटील, २) विलास अवचित पाटील,**
**३) कैलास अवचित पाटील (मयत) ३.अ) पुष्पाबाई कैलास पाटील**
**३.ब) कविता भानुदास पाटील, ३.क) विनोद कैलास पाटील**
**३.ड) भारती शरद पाटील, ३.इ) आशाबाई विठ्ठल पाटील,**
**३.ई) मनीषा प्रमोद देसले,**
**६)जगदीशभाई अवचितभाई पाटील, ७) अरस्तोलबाई वसंत पाटील... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै. अवचित दिपा पाटील हे मौजे हिंगोणी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. २२/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (जुडि) यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ५९१/२०२६

**१) कमलाबाई जगन्नाथ देशमुख, २) शोभा राजेंद्र देशमुख**
**३) भुपेंद्र राजेंद्र देशमुख, ४) राकेश राजेंद्र देशमुख ... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

**कै. दंगल उत्तम पाटील (मयत)** (मृत्यू ता. ०२/०९/२००८)
रा.मु. जुनेभामपूर ता. शिरपूर जि. धुळे. **... मयत**

ज्याअर्थी मयत दंगल उत्तम पाटील हे दि. ०१/०१/२०२५ रोजी मौजे आमोदे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून, आता अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी मयताची आई व अर्जदार नं. २ त्यांचे दोन मुलं असे एकूण चार मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०६/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल.

दि. २०/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जु. डि. वर्ग -१ यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ६२४/२०२६

**१) गं. भा. गंगुबाई दत्तात्रय चौधरी, २) दिलीप दत्तात्रय चौधरी,**
**३) नरहरी दत्तात्रय चौधरी, ४) रंजना भरत चव्हाण,**
**५) अशोक दत्तात्रय चौधरी ... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी मयत कै. दत्तात्रय निळकंठ चौधरी हे रा. तोंदे ता. शिरपूर जि. धुळे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. २२/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनि. डि. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ६३०/२०२६

**१) दराबाई अर्जुन वाडीले, २) रमेश अर्जुन वाडीले**
**३) मधुकर अर्जुन वाडीले, ४) रवींद्र अर्जुन वाडीले**
**५) सरिता पद्माकर धनराळे ... अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

मयत कै. अर्जुन मघा वाडीले हे दिनांक २४/९/२०२५ रोजी मौजे थाळनेर ता. शिरपूर जिल्हा धुळे येथे मयत झाले आहेत. अर्जदार नं. १ ते ५ यांनी मे. शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. जु. डी. यांचे न्यायालयात बॉम्बे रेग्युलेषण कायदा १८२७ कलम २ प्रमाणे अर्ज केला असून अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र साठी दाखल केला आहे.

तरी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व वारस बाबत कुणाची काही हरकत किंवा आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष वा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील आदेश करण्यात येतील.

दि. २०/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस नि. ६

### शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. जुनि. डिव्ही. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ५७१/२०२६

**१) विजयसिंग सोनू पावरा,**
रा. वलवाडी शिवार देवपूर, ता. जि. धुळे
**२) अजयसिंग सोनू पावरा,**
रा. खैरखुटी ता. शिरपूर जि.धुळे. **.. अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही ... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार विजयसिंग सोनू पावरा, वगैरे यांनी मे.न्यायालयात नामे सोनू तुमडू पावरा हे दि. ०६/११/२०२५ रोजी मौजे खैरखुटी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे सोनू तुमडू पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. ५/८/२०२६ रोजी ठिक १०.३० वाजता मे.न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २०/०७/२०२६ आदेशावरुन
सही... सही...
**कनिष्ठ लिपीक** **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, शिरपूर (कोर्टाचा शिक्का) दिवाणी न्यायालय, शिरपूर

## जाहीर नोटीस नि. ६

### मे.दिवाणी न्यायाधीश सो.शिरपूर यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज नं. ५६५/२०२६

**निर्मला रामराव पाटील, व. ५ ... अर्जदार**

विरुद्ध

**कोणीही नाही .... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील तसेच अर्जदार नं. ४ चे सासरे व अर्जदार नं. ५ चे आजोबा नामे रामराव उत्तमराव पाटील हे दि. १०/०४/२०२६ रोजी मौजे क्रांती नगर, शिंगावे रोड, शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाल्याचे अर्जदार नं. १ ते ५ यांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियमाच्या कालम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसने तमाम जनतेला कळविण्यात येते की, तमाम जनतेपैकी वरील मयताचे या अर्जदाराचा व्यतिरिक्त जे कोणी कायदेशीर वारस असतील त्यांनी मे. न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अगर दि. ३/०८/२०२६ रोजी ठिक १०.०० वाजता स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकती सादर कराव्यात. अन्यथा सदरील अर्जदाराच्या तोंडी लेखी पुरावा घेवून त्या आधारे अर्जदारां व्यतिरिक्त दुसरे कोणीच वारस नाही. असे गृहीत धरण्यात येवून मयताचे वारस म्हणून वारसांचे प्रमाणपत्र अर्जदार यांनी केलेल्या मागणी प्रमाणे देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर शिरपूर जि. धुळे यांचे आदेशावरुन प्रसिद्धीस दिली असे.

दि. २०/०७/२०२६ आदेशावरुन
सही... (कोर्टाचा शिक्का) सही...
**कनिष्ठ लिपिक** **सहा. अधिक्षक**

## पान १ वरुन

### जंतर मंतरवरील लाठी हल्याचा निषेध करत

परीक्षा पेपरफुटीच्या घटना घडल्या आहेत, त्या त्या राज्यांतील संबंधित गृहमंत्री आणि शिक्षण मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामे द्यावेत, अशी जोरदार मागणी घोषणाबाजीद्वारे करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून देशभरात पारदर्शक, भ्रष्टाचारमुक्त आणि विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था उभी करावी, अशीही मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. रॅलीदरम्यान सत्ताधारी भारतीय जनता पक्षाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा निषेध करत धुळ्यातून उठलेला आवाज देशभर पोहोचविण्याचा निर्धार मोर्चेकऱ्यांनी व्यक्त केला. या मोर्चात इंडिया आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच विविध समविचारी सामाजिक, विद्यार्थी आणि युवक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांचा आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. ढोल-ताशांच्या गजरात, हातात तिरंगा ध्वज आणि संविधान, लोकशाही व विद्यार्थी हक्कांचे संदेश असलेले फलक घेऊन सहभागी झालेल्या युवकांनी वातावरण भारावून टाकले. मोर्चामुळे शहरातील प्रमुख मार्गांवरील वाहतूक सुमारे एक तास प्रभावित झाली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस प्रशासनाने मोठा बंदोबस्त तैनात केला होता. पोलिसांच्या देखरेखीखाली रॅली शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. रॅलीदरम्यान अनेक रॅंलीत सहभागी राजकीय नेते व सामाजिक संघटना कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी यावेळी विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस कारवाईचा निषेध नोंदवत, लोकशाहीत मत व्यक्त करण्याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे, असे मत व्यक्त केले. देशातील तरुणांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी परीक्षा व्यवस्थेत मूलभूत सुधारणा करणे, विद्यार्थ्यांशी न्याय करणे आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा निषेध, देशभरातील पेपरफुटी प्रकरणांविरोधातील संताप आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी धुळ्यातून निघालेली ही विजयी तिरंगा रॅली केवळ निषेधापुरती मर्यादित नसून, देशभर जनजागृती घडवून आणण्याचा आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करणारी ठरली.

### पेपरफुटीच्या विरोधात नवे विधेयक मांडणार

नियुक्त करतील. आरोपपत्र दाखल केल्यापासून तीन महिन्यांच्या आत खटल्याची सुनावणी पूर्ण करणे बंधनकारक असेल.

या विधेयकात अपीलांसाठी कालमर्यादा देखील निश्चित करण्यात आली आहे. विशेष जलदगती न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल करता येईल. अशा अपीलांवर दोन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी होईल आणि तीन महिन्यांच्या आत त्यावर निर्णय देण्याचा प्रयत्न होईल. निर्णयाच्या ३० दिवसांच्या आत अपील दाखल करणे आवश्यक आहे. विशेष परिस्थितीत ही मुदत ९० दिवसांपर्यंत वाढवता येऊ शकते.

#### व्हिडिओ संदेशात मोदी म्हणाले

प्रश्नपत्रिका फुटणे ही किरकोळ बाब नाही. लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी ही एक वेदनादायी बाब आहे. त्यामुळे, प्रश्नपत्रिका फुटल्यापासून गेल्या अडीच महिन्यांत आम्ही अनेक पावले उचलली आहेत. दोषींना पकडण्यात आले असून ते तुरुंगात आहेत. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये याची खात्री करणे ही आमची जबाबदारी होती. म्हणूनच आम्ही कमी वेळेत २२ लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली आणि १९ जुलै रोजी निकालही जाहीर झाला.

#### जलदगती न्यायालय स्थापन निर्देश

आम्ही यावर समाधानी नाही. त्यामुळे आम्ही जलदगती न्यायालय स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. हे संपूर्ण प्रकरण ३ मे रोजी झालेल्या नीट यूजी पेपरफुटीशी संबंधित आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. सार्वजनिक परीक्षा गैरप्रकार प्रतिबंधक कायदा २०२४, हा देशातील पहिला केंद्रीय पेपरफुटी विरोधी कायदा आहे. या कायद्यानुसार, पेपर फोडणाऱ्यांना ३ ते ५ वर्षांचा तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते. जर एखादी टोळी सामील असेल तर ५ ते १० वर्षांचा तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांचा दंड आहे. जर परीक्षा संस्था पेपरफुटीसाठी दोषी आढळली तर शिक्षेमध्ये एक कोटी रुपयांचा दंड, परीक्षेच्या संपूर्ण खर्चाची वसुली आणि पुढील चार वर्षांसाठी कोणतीही परीक्षा घेण्यावर बंदी यांचा समावेश आहे. या कायद्यानुसार गुन्हेगारावर अजामीनपात्र आरोप लावले जातात. प्रकरण तडजोडीने मिटवता येत नाही. प्रकरणाचा तपास डीएसपी किंवा वरिष्ठ अधिकारी करतात.

### पेपरफुटीची समस्या गंभीर राष्ट्रीय संकट झाले

त्यामुळे अनेक भरती प्रक्रियांना दोन ते आठ महिन्यांचा विलंब झाला. २०२५-२६ मध्येही बोर्ड, भरती, पात्रता, विद्यापीठ आणि वैद्यकीय प्रवेश परीक्षांमध्ये पेपरफुटीच्या घटना सुरूच राहिल्या. नीट पेपरफुटीच्या घटनेनंतर विद्यार्थी आणि तरुणांमधील अनेक वर्षांपासूनचा रोष उफाळून आला. या पार्श्वभूमीवर जंतर-मंतर येथे आंदोलन छेडण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्याचा आरोप करत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या आंदोलनानंतर पेपरफुटीचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला असून, परीक्षा व्यवस्थेची पारदर्शकता, पेपर माफियांविरोधातील कारवाई आणि भरती प्रक्रियेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

### राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत झंडू कुमारला कास्य पदक

सुवर्णपदक, तर इंग्लंडच्या मॅथ्यू होर्डिंगने रौप्यपदक पटकावले. भारतासाठी पदक मिळविणाऱ्या झंडू कुमारचा संघर्षातून यशापर्यंतचा प्रवास झाला आहे. बिहारमधील नालंदा जिल्ह्यातील हरनौत येथील रहिवासी असलेला झंडू कुमार बालपणापासून पोलिओग्रस्त आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्याने वडिलांसोबत रस्त्यावर भाजीपाला विकला. कोविड-१९ महामारीच्या काळात त्याने ई-रिक्षा चालवून कुटुंबाला हातभार लावला. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होण्यासाठी झंडूने स्वतःची ई-रिक्षाही विकली होती. त्या स्पर्धेत त्याला एकही यशस्वी उचल करता आली नव्हती. मात्र, त्याची जिद्द आणि गुणवत्ता पॅरालिम्पिक कांस्यपदक विजेते राजिंदर सिंह राहेलू यांच्या नजरेत भरली. त्यानंतर भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रशिक्षण केंद्रात त्याला संधी मिळाली आणि त्याच्या कारकिर्दीला नवे वळण मिळाले. ग्लासगोमधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील हे कांस्यपदक झंडू कुमारच्या संघर्ष, चिकाटी आणि मेहनतीचे फलित मानले जात आहे. त्याच्या या यशामुळे भारताच्या पदक मोहिमेलाही दमदार सुरुवात मिळाली.

### दीपक अहिरे यांची रोटरी डिस्ट्रिक्टच्या

शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. इंजि. दीपक अहिरे हे रोटरी क्लब ऑफ धुळे क्रॉस रोडचे माजी अध्यक्ष आहेत. रोटरी वर्ष २०२३-२४ मध्ये अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांची या महत्त्वाच्या पदावर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबने समाजहिताचे अनेक नाविन्यपूर्ण व प्रभावी प्रकल्प राबवले. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, जलसंधारण आणि सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यात क्लबने विशेष कामगिरी केली.

त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळात रोटरी क्लब धुळे क्रॉस रोडला बेस्ट क्लब, तर इंजि. दीपक अहिरे यांना बेस्ट प्रेसिडेंट या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांसह एकूण २७ जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त झाले. विशेष म्हणजे त्यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या रोटरी कमल सादर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची जिल्हाभर प्रशंसा झाली आणि तो एक आदर्श सेवा प्रकल्प म्हणून ओळखला गेला.

## गौणखनीजाची वाहतूक तिघांविरुद्ध गुन्हा

धुळे, दि.२६ - सुकवद (ता. शिंदखेडा) शिवारात शिंदखेडा पोलिसांची शनिवारी गस्त सुरू होती. पोलिसांनी पाहणी केली असता तापी नदी पात्रात काही जण ट्रॅक्टरने अवैधरित्या वाळुची वाहतूक करीत होते. पोलिसांनी केलेल्या चौकशीत शासनाची रॉयल्टी पावती नसतांना वाळुची चोरटी वाहतुक करीत असल्याचे आढळले. हवालदार कमलेश कोठावदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित राजेंद्र आनंदा कोळी, सुनिल हिरालाल चव्हाण (दोघे रा. उंटावद ता शिरपुर), राजेंद्र नारायण कोळी (रा. अक्कडसे ता. शिदखेडा) यांच्याविरुद्ध शिंदखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. चार लाखाचे ट्रॅक्टर (एमएच १८/बीएक्स ५९१८), ७० हजारांची ट्रॉली, ५ हजार ५०० रुपयांची वाळु असा एकुण ४ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार इशी तपास करीत आहेत.

## नाशिक जिल्हाधकाऱ्यांचा पूरग्रस्तांशी संवाद

**नाशिक, दि २५ - जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आज दुपारी निफाड तालुक्यातील सायखेडा व चांदोरी परिसरास भेट देऊन पूरग्रस्त कुटुंबाशी संवाद साधला.**

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत पाऊस झाला. यामुळे गोदावरी नदीला पूर आला. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी आज दुपारी चांदोरी व सायखेडा परिसरास भेट देऊन पाहणी केली. यावेळी खासदार भास्कर भगरे, निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे आदी उपस्थित होते.

यादरम्यान जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सखे गं साजणी हा मराठी व्हिडिओ तयार करणाऱ्या गार्गी सागर आहेर या बाल कलाकाराची भेट घेऊन तिचे कौतुक केले.

सध्या गार्गी एका दूरचित्रवाणी मालिकेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या बालपणीची भूमिका साकारत आहे. यावेळी जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी गार्गीच्या अभिनय कौशल्याचे कौतुक करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कला, संस्कृती आणि सामाजिक भान यांचा समतोल साधत प्रगती करणाऱ्या नवोदित कलाकारांचे यश समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# गंभीर आजारांवर पैसे नाही म्हणून उपचार थांबणार नाही -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**नागपूर, दि. २६ : आजार कितीही गंभीर आणि मोठा असला तरी केवळ पैसे नाही म्हणून गरिबांचे उपचार थांबू नये, यासाठी राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध केला आहे. येथे आयोजित महाआरोग्य शिबिर हे गरीब रुग्णांसाठी एक वरदान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्रांगणात आयोजित महाआरोग्य शिबिरात आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार अजित गोपछडे, आमदार सर्वश्री. प्रवीण दटके, संजय भेंडे, मोहन मते,राजीव पोतदार, महापौर नीता ठाकरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

समाजातील शेवटच्या घटकाला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या हाच या शिबिराचा उद्देश असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, सर्वांना आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतले. रुग्णालयांची संख्या वाढवली. राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत यापूर्वी जे गंभीर आजार नव्हते, ते समाविष्ट केले. गेल्या दीड वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे हजार रुग्णांना कोटी रुपये उपचारांसाठी उपलब्ध करून दिले. सर्व धर्मादाय रुग्णालयातील खाटा गरिब रुग्णांसाठी राखीव असल्या पाहिजे, यासाठी डिजिटल पद्धती निर्माण केली. जवळपास आजार असे आहेत की जे योजनेच्या लाख रुपयांच्या मर्यादेत बसू शकत नाही, त्यामुळे त्यासाठी लाखांपर्यंत, तर काही आजारांच्या बाबतीत लाख रुपयांपर्यंत मदत करण्याचे शासनाचे धोरण असल्याची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिली.

ऐकू न आल्यामुळे बोलता न येणाऱ्या मुलांची समस्या लक्षात घेता लहान मुलांसाठी कॉकलीयर इम्प्लांट शस्त्रक्रिया निःशुल्क सुरु केल्या. त्यामुळे ही मुले ऐकू शकतील व बोलूही शकतील. पुढच्या पिढीत कोणीही मूक-बधिर असणार नाही, यासाठी शासन प्रयतक करीत आहे. दिव्यांग बांधवांना येत्या ऑगस्ट रोजी कृत्रिम पाय- हात यांचे वितरण केले जाणार आहे. सेवा हाच आमचा धर्म आहे. त्यामुळे गरिबातल्या गरीब माणसाला मदत करून समाज निरोगी होण्याच्यादृष्टीने आम्ही प्रयतक करीत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून गोरगरीबांची सेवा होत असल्याची भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. कँसरवरील काही कॅप्सुल, इंजेक्शन यांचा खर्च प्रचंड आहे. तो कमी करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने प्रयतक करावे, अशी अपेक्षा श्री. गडकरी यांनी व्यक्त केली.

प्रारंभी माजी आमदार संदीप जोशी यांनी प्रास्ताविकात या शिबिरामागची भूमिका सांगितली. ते जुलै या काळात शहरात विविध ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील साडे चार हजार रुग्णांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती श्री. जोशी यांनी यावेळी दिली. तत्पूर्वी, फिरता दवाखाना, रुग्णवाहिका यांचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर दिव्यांग बांधवांना यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते व्हील चेअरचे वितरण करण्यात आले. अनेक संस्थांतर्फे यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच गंगाधरराव फडणवीस स्मृती डायग्नोस्टिक सेंटरला देणगी आणि रुग्णवाहिका प्रदान करण्यात आली. हे सर्व दाते तसेच महाशिबिराच्या आयोजनात सहभागी डॉक्टरांचा सत्कार यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. आभार शिबिराचे सहसंयोजक नगरसेवक रितेश गावंडे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. दरम्यान या महाआरोग्य शिबिरात हृदयरोग, त्वचा, कर्करोग, रोंग, आकस्मिक विभाग, नेत्र, ईएनटी, यासह अनेक आजारांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत करण्यात आली. नागपूर शहर तसेच जिल्ह्यातून आलेल्या हजारो रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेतला. या रुग्णांना औषधे निःशुल्क देण्यात आली तसेच त्यांच्या विविध चाचण्या आणि शस्त्रक्रियांसह अन्य उपचारांची व्यवस्थाही आयोजकांतर्फे निःशुल्क करण्यात आली.

## गौ-सन्मान अभियान रॅलीचे सोमवारी आयोजन

धुळे, दि.२६ - गौमातेची सध्याची दुःखद परिस्थिती बघता भारतातील समस्त साधू संतांनी केंद्र सरकारने उपाययोजना कराव्या यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून संपूर्ण देशात गौसन्मान आवाहन अभियान सुरु आहे.

अभियानाचा पहिल्या टप्प्यात भारतातील पाच हजार तालुक्यात एप्रिल महिन्यात गौसन्मान रॅली काढून सरकारचे लक्ष वेधण्यात आले होते. परंतु तीन महिने उलटूनही अद्याप पावेतो सरकारने उपाययोजना केली नाही. म्हणून अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात जिल्हास्तरीय गौसन्मान रॅलीचे आयोजन भारतातील प्रत्येक जिल्ह्यात करण्यात आले आहे. धुळे येथे दिनांक २७ जुलै सोमवार रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक आग्रा रोड येथून रॅलीचा प्रारंभ होऊन फुलवाला चौक, महाराणा प्रताप चौक, जिल्हाधिकारी कार्यालय धुळे येथे रॅलीचा समारोप होईल, त्यानंतर जिल्हाधिकारी साहेब यांच्या मार्फत महामहिम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, महामहिम राज्यपाल, मुख्यमंत्री यांना हजारो स्वाक्षरींचे निवेदन दिले जाईल. निवेदनात गौमाता राष्ट्र माता घोषित करणे, केंद्रीय गोसेवा आणि संरक्षण कायदाफ लागू करून देशातील सर्व कत्तलखान्यांचे परवाने रद्द करावे, स्वतंत्र केंद्रीय गौ मंत्रालय स्थापन करावे यासह अन्य मागण्यांसाठी भव्य गौसन्मान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी समस्त गौभक्त गौप्रेमींनी हिंदु बंधू भगिनींनी या गौसन्मान रॅलीमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गौसन्मान आवाहन अभियानाचा वतीने करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### निंबा दशपुते



साक्री, दि.२६ (प्रतिनिधी )- श्रमिक विद्यालय छडवेल पखरूण चे सेवानिवृत्त विज्ञान शिक्षक व साक्री तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेचे मानद सचिव निंबा कृष्णा दशपुते (वय ७५) साक्री यांचे आज दि.२६ जुलै रविवार रोजी दुपारी १२ वाजता दुखःद निधन झाले त्यांची अंत्ययात्रा उद्या दिनांक २७ जुलै २०२६ वार सोमवार रोजी सकाळी १० वाजता श्री छत्रपती नगर,कोर्टाच्या पाठीमागे, कर्मवीर नगर जवळ, साक्री येथील राहत्या घरापासून निघेल. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, सून, जावाई व नातवंडे असा परिवार असून दगडू कृष्णा दशपुते नाशिक यांचे बंधु तर विजयकांत दशपुते यांचे वडील होत.

## गजानन महाराज मंदिरात पारायणास उत्तम प्रतिसाद

धुळे, दि.२६- श्री गजानन महाराज मंदिर, साई दर्शन कॉलनी, मिल परिसर, धुळे येथे गुरुपौर्णिमेनिमित्त श्रीविजयग्रंथ पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २३ जुलै २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत दररोज तीन अध्यायांचे वाचन करण्यात येत असून, पारायणाला परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या सात दिवसीय पारायणामध्ये सुमारे ४० ते ५० महिला व पुरुष भाविक नियमितपणे सहभागी होत आहेत.

## उठावणा



श्री.नेहुल पटेल एवं श्री. खंतील पटेल इनके पुज्य पिताजी

**स्व.राग्नेश भाई कन्हुभाई पटेल**

इनका स्वर्गवास दि.२३ जुलै २०२६ वार- गुरुवार को सुबह ७ बजे हो गया है। उनका **उठावणा** सोमवार दि. २७ जुलै २०२६ को शाम ४ से ६ बजे निलकंठेश्वर महादेव मंदिर, जयशंकर कॉलनी, चालीसगांव रोड, धुळे पर रखा है।

-: शोकाकुल :-

**समस्त पटेल परिवार, धुळे**

**पाहिजेत**

कामासाठी पाहिजे
सेल्समन - २
सेल्सगर्ल - २
श्याम वॉच ॲण्ड गिफ्ट सेंटर
फुलवाला चौक, धुळे
7219036785
9960777594

**पाहिजेत**

दुकान कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
राम ड्रेसेस
महात्मा गांधी पुतळ्याजवळ, धुळे

**डी. पी. इंजिनिअर्स**




BOSCH Invented for life
सुप्रसिद्ध बॉश कंपनीचे
वायपर ब्लेड्स
58 वर्षांची विश्वसनीय सेवा...
डी. पी. इंजिनिअर्स
अधिकृत बॉश डिझेल सर्व्हीस - A.7 उद्योग नगर, मुंबई आग्रा रोड, धुव होंडा शोरूमच्या बाजुला, धुळे
Cell: 94030 88893 / 94222 89693

**पाहिजेत**

टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**

इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**त्वरीत पाहिजे**

Cosmetic, Gift, Decoratian
व लेडीज पार्लरसाठी अनुभवी लेडीज पाहिजे.
9423191694

**पाहिजेत**

स्कूल युनिफॉर्मच्या शोरूम करिता
मुले/मुली पाहिजेत
शिक्षण : १०वी/१२वी/पदवीधर
(कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक)
CLEVER KEN FACTORY OUTLET
दु.नं. १९,एस.ए. मिशन कॉम्प्लेक्स,जयहिंद सिनिअर कॉलेजच्या बाजूला, देवपूर, धुळे
मो. 9987706455,9923597722

Godrej

27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट

BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
नियम व अटी लागू*
ak media- 238222
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763

## पान १ वरुन

### नीट पेपरफुटी विरोधातील आंदोलनाला यश

संख्येने हातात तिरंगा, बॅनर ,पोस्टर घेत ढोल-ताशा-वाजंत्रीच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. कार्यकर्त्यांनी मेलोडी चॉकलेट व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. विद्यार्थी आणि युवकांनी विद्यार्थी एकजुटीचा विजय असो,पेपरफुटी करणाऱ्यांना फाशी द्या अशा घोषणा दिल्या. यावेळी बोलताना संपर्कप्रमुख गुलाबराव वाघ यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली.

ते म्हणाले,नीट सारख्या राष्ट्रीय परीक्षेत झालेला घोटाळा हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून लढा दिला आणि त्याला यश मिळाले. मात्र धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आधीच राजीनामा दिला असता, तर एवढे विद्यार्थी जखमी झाले नसते किंवा मृत्युमुखी पडले नसते. विद्यार्थ्यांनी राजकारणाचा बळी पडू नये, परंतु जेव्हा सरकारच विद्यार्थ्यांच्या विरोधात उभे राहते तेव्हा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागते. आजचा दिवस हा विद्यार्थी शक्तीच्या विजयाचा दिवस आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी बोलताना सांगितले की गेल्या महिन्यात झालेल्या नीट परीक्षेत पेपरफुटीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर देशभरातील विद्यार्थी आक्रमक झाले होते. दिल्लीतील जंतर मंतरवर विद्यार्थी संघटनांनी आमरण उपोषण आणि आंदोलन केले होते. या दबावामुळे सरकारला कारवाई करावी लागली आणि आंदोलनाला यश मिळाले.

यावेळी जिल्हाप्रमुख पंडित माळी,उपजिल्हाप्रमुख डॉ हेमंत शर्मा, जिल्हा सचिव दिनेश सोनवणे ,महिला आघाडीचा जिल्हाअध्यक्ष रीना पाडवी ,युवा सेनेचे जिल्हाधिकारी सागर पाटील ,तालुकाप्रमुख रमेश पाटील, व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बापू महाजन ,युवा सेना सचिव अक्षय श्रीखंडे, युवा सेना उपजिल्हाधिकारी दिनेश भोपे ,मन्नान गणी शिकलीकर ,चारु बागुल, शहर संघटक भक्तवत्सल सोनार ,उप जिल्हा संघटक सुनील सोनार, युवा सेना शहर अध्यक्ष शेखर जाधव इम्तियाज खान,निंबा पाटील, बबलू नागरे ,जाफर शाह,आकाश वळवी, तसेच प्राजक्ता शिंदे ,हर्षदा शिंदे ,अनुष्का शिंदे, सुशांत पाटील ,स्वामी भामरे ,तन्मय पवार व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

### माजी सैनिक व एनसीसीच्या विद्यार्थ्यांसमवेत

हा संदेश थेट सरहद्दीवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांपर्यंत पोहोचेल.

#### परमवीर चक्र विजेत्यांच्या शौर्याला सलाम

या प्रसंगी १९९९ च्या कारगिल युद्धात मपरमवीर चक्रफ मिळवणाऱ्या कॅप्टन विक्रम बत्रा, कॅप्टन मनोज पांडे, सिपाही संजय कुमार आणि ग्रेनेडियर योगेंद्र सिंह यादव या वीर सुपुत्रांच्या शौर्याचे स्मरण करण्यात आले. अवघ्या २२ वर्षांच्या वयात २३ गोळ्या लागूनही जिद्दीने शत्रूचा खात्मा करणाऱ्या योगेंद्र सिंह यादव यांच्या अदम्य साहसाचा दाखला देत, हा इतिहास शाळा आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून मजय हिंद, जय भारतफच्या घोषणेने कार्यक्रमाची सांगता झाली.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०